महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या अमंलबजावणीसाठी SLBC अंतर्गत राज्य, जिल्हा व गट स्तरीय समित्यांची स्थापना.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक : एसएलबीसी २०१२/प्र.क्र.२०४/यो-३,
२५, बांधकामभवन, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१, दिनांक १६ जानेवारी, २०१३.

वाचा :१) शासन निर्णय क्रमांक -एनआरएलएम -२०११/प्र. क्र. १९६/यो -३, दि. १८ जुलै, २०११.
२) शासन निर्णय क्रमांक : एसएलबीसी २०१२/प्र.क्र.२०४/यो-३, दि. २० नोव्हेंबर, २०१२.

**निर्णय :-**

समक्रमांक दिनांक २० नोव्हेंबर, २०१२ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढील शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे :-

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना पतपुरवठा करण्याकरिता व बँकेच्या समन्वयाने अभियानाची अंमलबजावणी करण्याकरीता SLBC अंतर्गत खालील समित्या गठीत करण्यात येत आहे:-

**अ) राज्यस्तरीय बँक सुकाणू समिती :-**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियांनातर्गत स्वयंसहाय्यता गट व बँक जोडणी संदर्भात राज्यस्तरीय धोरण ठरविणे व अभियानाची अंमलबजावणी करणारे अधिकारी व बँक यांच्यातील अडचणीचे निराकरण करण्यासाठी राज्यस्तरावर मा. मंत्री (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बँक सुकाणू समितीची स्थापना करण्यात येत आहे.

**राज्यस्तरीय बँक सुकाणू समितीची रचना :-**

| | |
|---|---|
| १. मा.मंत्री (ग्रामविकास) | अध्यक्ष |
| २. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) | सहअध्यक्ष |
| ३. प्रधान सचिव (ग्रामविकास) | सदस्य |
| ४. उपसचिव, (योजना), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५. महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र व संयोजक राज्यस्तरीय बँकर्स समिती, पुणे | सदस्य |
| ६. सीजीएम, नाबार्ड, बांद्रा (पूर्व), मुंबई. | सदस्य |
| ७. महाव्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया | सदस्य |
| ८. महाव्यवस्थापक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया | सदस्य |
| ९. महाव्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया | सदस्य |
| १०.राज्यसमन्वयक, आरसेटी | सदस्य |
| ११.रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी, | सदस्य |
| १२.प्रादेशिक ग्रामीण बँक (RRB) चे प्रतिनिधी | सदस्य |
| १३. दोन विविध बँकांचे प्रतिनिधी | निमंत्रित |
| १४. दोन प्रकल्प संचालक /मुख्य कार्यकारी अधिकारी | निमंत्रित |
| १५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय बँक सुकाणू समितीची कार्ये :-**

१. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना जास्तीत जास्त पतपुरवठा व्हावा तसेच बँकांसंबंधी अडचणीचे निराकरण व्हावे याकरीता नियोजन, समन्वय, सनियंत्रण आणि आढावा घेणे.

२. राज्यस्तरावर धोरण ठरविणारे तसेच स्थानिक पातळीवर अंमलबजावणी करणाऱ्या संस्था व बँका यांच्यामध्ये सुसवांदासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
३. पतपुरवठा संदर्भात आढावा घेणे. तसेच यासंदर्भातील व्यवस्थेमध्ये आवश्यक असेल तेव्हा बदल किंवा सुधारणा याबाबत शिफारस करणे.
४. आरसेटी चा आढावा घेणे व ग्रामीण जिवनोन्नती अभियानाच्या अंमलबजावणीसाठी बँकांच्या संदर्भातील अनुषंगिक बाबी.

**सदर समिती किमान तीन महिन्यातून एकदा आढावा घेईल. तथापि, प्रधान सचिव (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा समन्वयासाठी आढावा घेण्यात येईल.**

**ब) जिल्हास्तरीय समन्वय समिती :-**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियांनाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी व तीच्या अंमलबजावणीमधील त्रुटी दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समितीची स्थापना करण्यात येत आहे.

**जिल्हा स्तरीय समन्वय समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक | अध्यक्ष |
| २. | नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक | सदस्य |
| ३. | अंमलबजावणी करणाऱ्या सर्व बँकांचे जिल्हास्तरावरील प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | संबंधीत कार्यालयाचे जिल्हास्तरावरील अधिकारी | सदस्य |
| ५. | अग्रणी बँक अधिकारी (LBO) | सदस्य |
| ६. | महिला स्वयंसहाय्यता गटाचे प्रतिनिधी/ संबंधीत जिल्ह्यामधील जीवनोन्नती संस्थाचे प्रतिनिधी (दोन) | निमंत्रित |
| ७. | दोन गट विकास अधिकारी/ ब्रँच मॅनेजर | निमंत्रित |
| **८.** | **प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण यंत्रणा तथा सह अभियान संचालक** | **सदस्य सचिव** |

**जिल्हा स्तरीय समन्वय समितीची कार्य :-**

१. योजनेच्या आराखडयाचा आढावा घेणे,
२. योजनेची भौतिक व आर्थिक सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेणे व सनियंत्रण करणे,
३. योजनेच्या अंमलबजावणीमधील सहभागी संस्थांच्या व बँकांच्या कार्यभिन्नतेचे पृथकरण करणे व राज्य स्तरीय समितीच्या विचारार्थक प्रस्ताव तयार करणे,
४. स्वरोजगाराच्या प्रशिक्षणांची गरज विचारात घेणे व त्यांच्या प्रशिक्षणांसाठी केलेल्या व्यवस्थेचा आढावा घेणे,
५. बँकनिहाय व गटनिहाय कर्जपुरवठा, मंजुरी व वसुलीबाबत सनियंत्रण करणे व त्याप्रमाणे आवश्यक ते उपाययोजना करणे.
६. आरसेटी चा आढावा.

**सदर समिती किमान दोन महिन्यातून एकदा आढावा घेईल.**

**क) गट स्तरीय समन्वय समिती :-**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियांनाचा गट स्तरावर प्रगतीचा आढावा घेण्यासाठी व तीच्या अंमलबजावणीमधील त्रुटी दूर करण्यासाठी गट स्तरीय समन्वय समितीची स्थापना करण्यात येत आहे.

**गट स्तरीय समन्वय समितीची रचना :-**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | अध्यक्ष |
| २. | प्रकल्प अधिकारी, स्वंयरोजगार | सदस्य |
| ३. | गटामध्ये अंमलबजावणी करणारे सर्व बँकांचे शाखा व्यवस्थापक | सदस्य |
| ४. | दोन स्वंयसेवी संस्थांचे प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५. | स्वयंसहाय्यता गटाचे प्रतिनिधी, संबंधीत ब्लॉकमधील जीवनोन्नती संस्थाचे प्रतिनिधी (आवश्यकतेप्रमाणे) | निमंत्रित |
| **६.** | **गटविकास अधिकारी, पंचायत समिती** | **सदस्य सचिव** |

**गट स्तरीय समन्वय समितीची कार्य :-**

१. कार्यक्रम / योजनेच्या सुरुवातीलाच घ्यावयाचे प्रमुख उपक्रम/उद्योग यांची निवड करणे,
२. प्रत्येक वर्षी योजनेच्या अंमलबजावणीसाठी गावांची निवड करणे व किती स्वरोजगारांना मदत द्यावयाची याची संख्या निश्चित करणे,
३. बँकाच्या शाखांमध्ये कामाचे वाटप करणे,
४. विविध संस्था/यंत्रणा यांच्या प्रगतीवर देखरेख ठेवणे,
५. पायाभूत सुविधा, कर्ज, तंत्रज्ञान व विपणन इत्यादींबाबत समन्वय साधणे,
६. स्वयंरोजगाराच्या उत्पन्नाचा आढावा घेणे,
७. कर्ज वसूलीच्या प्रगतीचा आढावा घेणे व कर्ज वसूली मेळाव्यासाठी तारखा निश्चित करणे,
८. मत्ता तपासणीसाठी नमुना संहिता तयार करणे,
९. मासिक अहवाल तयार करणे,
१०. दारिद्रय रेषा ओलांडणाऱ्या स्वरोजगारांच्या प्रगतीचा आढावा घेणे,
११. सदर समिती दर महिन्याच्या ५ ते १० तारखे दरम्यान आढावा बैठक घेईल.
१२. सदर सभेस प्रकल्प संचालकांना महत्वाचे काम असल्यास त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली बैठक होईल.

**वर सुचविलेल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व गटविकास अधिकारी यांनी या स्तरावरील समितीची स्थापना त्वरीत करावी. समित्यांच्या आयोजित केलेल्या बैठकीबाबत सदस्य सचिव, राज्यस्तरीय बँक सुकाणू समितीस व शासनास कळवावे.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २०१३०११३१५४१०३५०२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अनिल काळे)
अवर सचिव, ग्रामविकास

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (ग्रामविकास), यांचे स्वीय सहायक,
मा.राज्यमंत्री (ग्रामविकास), यांचे स्वीय सहायक,
मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,
सचिव, नियोजन/वित्त / ग्रामविकास / सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/महिला व बाल कल्याण/ सहकार/कृषि व पदुम/उद्योग, उर्जा व कामगार/ आरोग्य/ शालेय शिक्षण/ उच्च व तंत्र शिक्षण/ रोजगार व स्वयंरोजगार, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
उप सचिव (योजना), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
संचालक जनरल मॅनेजर व निमंत्रक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.
महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, राज्य अग्रणी बँक, व संयोजक राज्यस्तरीय बँकर्स समिती, पुणे
सीजीएम, नाबार्ड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
महाव्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया
महाव्यवस्थापक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया
महाव्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया
राज्यसमन्वयक, आरसेटी
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई.
निवडनस्ती.